**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**
(सकाळ)

जा.क्र. ५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०१/२०१७

**१) जादुटोना करण्याच्या कारणावरून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २३/०१/२०१७ चे १९.०० ते १३.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी आनंदराव आत्माराम मते वय ४८ वर्ष रा. पालोरा यांना तु जादुखोर आहेस व जादुटोना करतोस असे बोलुन शिवीगाळ करून थापडाने मारून गावात बदनामी करून जिवेमारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २(१) (ख) ७, ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अगोरी जादुटोना करण्याबाबत प्रती. अधीनियम सन. २०१३ सहकलम ५०४,५०६,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. नी. नागरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहनाची दुचाकी वाहनाला धडक लागुन दोन जखमी. –**

दिनांक २३/०१/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रजनी सुरेश रोकडे वय ४३ वर्ष रा. काणानगरी बेला हिची मैत्रीन हि तिच्या आई सोबत दुचाकी क्र.एमएच ३६ एस ०६३९ ने रोड क्रॉस करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील चारचाकी वाहन हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन दुचाकी वाहनाला समोरून धडक देवुन मैत्रीनीची आई सौ. रेखा लिलाधर मोहरकर वय ५९ वर्ष रा. बेला व मैत्रीन कु. स्मिता लिलाधर मोहरकर वय २४ वर्ष रा. बेला यांना गंभीर जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून व आरोपीचा मुलाहिजा केला असता सामान्य रूग्णालय भंडारा येथील डॉ. नी मदयप्राशन केल्याबाबतचा वैदयकीय अहवाल दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,१८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई:–**

दिनांक २३/०१/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल टिव्हीएस स्मार्ट क्र. एमएच ३६/०३१३ चा चालक हा दारू पिवुन दारूचे नशेत चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर मशीन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमान मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. मते पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २३/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, साकोली, व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०७ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल कि. २६,६००/–रु. व ०१ लिटर ९८० मिलीलीटर देशी /विदेशी दारू कि. १,००० /–रू तसेच जुगारातुन कि. ७२५ /–रू असा एकुण २८,३२५/–रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.